Peer Reviewed

ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Issue XI , Vol. III (Indexed) Oct. 2020 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

# Index

1. Digital Banking :An Overview 5
Dr Madhukar P Aghav

2. Financial Markets : Evaluating Averages and Indicators 13
Dr Sachin Nagnath Hadoltikar
Memon Sohel Mohd Yusuf

3. Human Resource Management (Hrm) : An Overview 19
Dr. Kathar Ganesh. N.

4. Impact of Mergers & Acquisition on Private Sector Banks In Global Economy 26
Dr. Nanaji Krishna Aher

5. Dramatic Stress: The Spirit of Play 32
Sheema Farheen
Dr Farhat Durrani

6. Recent Trend InBanking 41
Swapnil .Kalyan. Laghane, Dr Quazi Baseer Ahmed

7. Corporate Governance in Maharashtra Companies 49
Dr. Rajesh Bhausaheb Lahane

8. Effective Digital Marketing Strategies & Approaches 59
Dr Vikrant Uttamrao Panchal

9. Global Competitiveness of Indian Industries Strategy and Innovation 70
Dr. Rajendra Ashokrao Udhan

10. Indian logistics Trade in Dynamic World Scenario 79
Adnan Ali Zaidi, Dr Memon Ubed

11. Demonetization: Before And After Menkudle D.V 95
Dr. Shahuraj S. Mule

12. लातूर जिल्ह्यातील मराठी महिन्यानुसार यात्रांचे वितरण : एक भौगोलिक अभ्यास 99
प्रा.डॉ.आर.एस. धनुश्वर

13. भारत- अमेरिका संबंध १९९० नंतर 102
प्रा.डॉ.धुमाळे धोंडीराम कामाजी

14. हस्त भरत कला – मार्गदर्शन आणि उपयोगिता हस्त–भरतकलेचा इतिहास : 105
डॉ. एम.एन साखळकर

15. अध्यापन पध्दती व व्यावसायिक विकास घडवून आणणाऱ्या सुधारणा 109
डॉ. सतीश नारायण लोमटे

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Issue XI , Vol. III (Indexed) Oct. 2020 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

# भारत- अमेरिका संबंध १९९० नंतर

**प्रा.डॉ.धुमाळे धोंडीराम कामाजी**

राज्यशास्त्र विभाग प्रमुख, शिवनेरी महाविद्यालय,शिरुर अनंतपाळ

---

आंतरराष्ट्रीय राजकारणात 1990 नंतर प्रचंड प्रमाणात परिवर्तन घडून आले. जागतिकीकरण, उदारीकरण, खाडीयुद्ध, सो रशियाचे विघटन या सर्व घटनांची सुरुवात झाली. या घटनेचा परिणाम भारत- अमेरिका यांच्या धोरणावर व परस्पर संबंधावर झाला. अमेरिका भारत विषय दृष्टिकोनात सकारात्मक परिवर्तन होण्यास सुरुवात झाली. अमेरिका भारताविषयी, आर्थिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात सोबत सहकार्य व मदत करण्यास पुढे येऊ लागली.

1991 नंतर रशियाचे विभाजन झाले. त्याचे नवीन पंधरा देश झाले. त्यामुळे नवीन जागतिक व्यवस्थेची हळूहळू सुरुवात झाली. जगातील अनेक देशांनी आपल्या परराष्ट्र धोरणात अनेक बदल केले. या सर्व घटनेचा परिणाम भारत अमेरिका संबंधावर पडला. त्यामुळे अमेरिकाला भारताची जवळीकता वाटू लागली. त्यामुळे भारत- अमेरिका हे दोन देश जवळ आले. रशियाचे विघटन आणि जगात झालेली शीतयुद्धाची समाप्ती यामुळे भारताच्या परराष्ट्र धोरणात अनेक प्रश्न निर्माण झाले. याचा प्रभाव भारताच्या धोरणावर अनेक प्रश्नचिन्ह निर्माण झाले. या सर्व बाबीमुळे भारताने आपल्या परराष्ट्र धोरण नीतीच्या संकल्पनेत निश्चितच पुन्हा विचार करण्याची आवश्यकता निर्माण झाली. सो.रशियाच्या विघटनानंतर अमेरिकेचा भारताप्रती एक सहयोगी राष्ट्राच्या स्वरुपात जो दृष्टिकोन होता यात निश्चित अंतर पडेल. भारताच्या परराष्ट्र धोरणात मुलभूत परिवर्तन झाले नाही परंतु भारताच्या परराष्ट्र धोरणात अंशतः परिवर्तन झालेले दिसून येते. यातून भारत- अमेरिका बदलत्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीत एक दुसऱ्यांच्या हितसंबंधाविषयी माहिती झाली. भारत- अमेरिकेला समजले की, आपले परस्पर संबंधातील नकारात्मक पैलू आहेत त्याला सकारात्मक बनविण्यावर भर दिला पाहिजे.

**1990 नंतर भारताच्या परराष्ट्र धोरणात झालेला बदल**

1. जागतिक राजकारणात फार मोठा बदल झाला. गेल्या 45 वर्षापासून अमेरिका-रशिया शीतयुद्ध समाप्त झाले. 1990 पासून अमेरिकेच्या एकाधिकारशाहीला सुरुवात झालेली दिसून येते.
2. जागतिक मुक्त बाजार अर्थव्यवस्थेला 1990 नंतर विशेष महत्त्व प्राप्त झाले. 1995 ला गॅट कराराचे रुपांतर WTO मध्ये झाले. जगातील अनेक देशांनी WTO चे सदस्य असल्यामुळे या संघटनेच्या नियमाशी ते बांधील होते. या सर्व बाबीमुळे भारताने आपल्या परराष्ट्र धोरणात बदल केले.
3. या कालखंडात जगाचे सर्व संदर्भ बदलेले दिसून येतात. भारतालाही जगाच्या परिवर्तनाप्रमाणे आपल्या परराष्ट्र धोरणात बदल करणे आवश्यक वाटू लागले तसे परिवर्तन भारताने केले.
4. दुसऱ्या महायुद्धानंतर संपूर्ण जग हे शीतयुद्धात गुंतले होते. शीतयुद्धाच्या काळात भारत अलिप्ततावादी धोरणात होता. रशियाचे पंधरा तुकडे पडले. शीत युद्ध समाप्त झाले. आंतरराष्ट्रीय राजकारणात रशियाचा जो प्रभाव होता तो कमी झाला. आंतरराष्ट्रीय वर्चस्वासाठी आपल्या परराष्ट्र धोरणात बदल केल्याशिवाय भारतासमोर पर्याय राहिला नाही.
5. रशियाचे तुकडे पडल्यामुळे रशियाची ताकद कमी झाली. अमेरिकेची हुकुमशाही खऱ्या अर्थाने सुरु झाली. या काळात अमेरिकेला विरोध करणे भारताला परवडणारे नव्हते. त्यामुळे भारताने अमेरिकाबरोबर मैत्री वाढविल्यास सुरुवात केली. त्यामुळे भारताला आपल्या परराष्ट्र धोरणात बदल करणे क्रमप्राप्त झाले.
6. औद्योगिकरणामुळे दळणवळणामध्ये बदल झाले. दळणवळणासाठी आवश्यक घटक डिझेल, पेट्रोल, केरोसीन हे जगातील कांही देशामध्ये संबंधीत देशाच्या गरजेनुसार तेथे उत्पादन होते. भारतामध्ये म्हणावे तेवढे तेल उत्पादन होत नाही. त्यामुळे भारतासारख्या अनेक देशांना तेल निर्यात देशाकडून तेल घ्यावे लागत होते. वाढत्या तेलांची गरज पाहून तेल उत्पादक देशांनी OPEC संघटना स्थापन केली. या संघटनेच्या माध्यमातून तेलाच्या प्रचंड किंमती वाढल्या. यांच्या परिणाम विकसीत, अविकसीत विकसनशील देशांवर पडला. त्यामुळे भारताला आपल्या परराष्ट्र धोरणात बदल करावा लागला.

| Issue XI , Vol. III (Indexed) Oct. 2020 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

7. 1990 नंतर अमेरिकेने दक्षिण अशियात आपला प्रभाव वाढविला. अमेरिकेने या भागात आपले हस्तक्षेपेचे धोरण सुरु केले. यात पाकिस्तान, इराक, ईराण, ईस्त्राईल, कोरिया या देशाचा समावेश होता. या वरील बाबीमुळे भारताला आपल्या परराष्ट्र धोरणात बदल करावा लागला.
8. पाकिस्तानला ही गोष्ट कळाली की, भारताला आपण सरळ पराभूत करु शकत नाही तेंव्हा त्यांनी वेगवेगळे मार्ग अंवलबलेले दिसून येतात.उदा. भारताच्या विरोधात खोटा प्रचार, भारताच्या सैन्याला मारणे व त्यांची हात,बोटे तोडणे त्यामुळे भारताने बदलत्या परराष्ट्र धोरणात पाकिस्तान केंद्रीत परराष्ट्र धोरणाला फाटा दिला. भारताने आपल्या परराष्ट्र धोरणात बदल केले.
9. निःशस्त्रीकरणाला भारताने स्वातंत्र्य काळापासून समर्थन केले होते. परंतु बदलत्या काळानुसार भारताने शस्त्रनिर्मितीला प्राधान्य दिले. त्याशिवाय आपले संरक्षण होणार नाही. आपल्या नादाला कोणी लागणार नाही याची जाणीव भारताला झाली.

**1990 नंतर भारत- अमेरिका संघर्षाचे मुद्दे**

1. भारताने NPT आणि CTBT या अण्वस्त्रबंदी करारावर सही करण्यास नकार दिला. या करारातून गरीब आणि लहान देशांवर अन्याय होत आहे.याची जाणीव भारताला झाली. त्यामुळे भारत अमेरिका संघर्ष वाढत गेला. NPT व CTBT या करारामध्ये युनोमधील पाच कायम देशांना शस्त्रास्त्र नष्ट करण्याचे कोणतेही बंधन घातले गेले नाही. गरीब राष्ट्रांवर मात्र अनेक बंधने घातली गेली. त्यामुळे भारताने या वरील दोन्ही करारावर सहया केल्या नाहीत. त्यामुळे भारत-अमेरिका संघर्ष वाढत गेला.
2. 1974 साली भारताने जी अणुचाचणी केली. त्यामुळे भारत-अमेरिका संबंध बिघडले. भारताचा उद्देश हा आपल्या संरक्षणासाठी ही अणुचाचणी केली होती. शेजारी राष्ट्राकडून आपणास कोणताही धोका होऊ नये. परंतु अमेरिकेने यांचे अनेक वेगवेगळे अर्थ काढले. त्यामुळे भारत-अमेरिका संबंधात बिघाड निर्माण झाला.
3. अमेरिकेने युनोत भारताला कायम सदस्य करण्यास नकार दिला. जपान, जर्मनी या देशांनाही कायम सदस्य करण्यास अमेरिकेने नकार दिला. अमेरिकेला असे वाटू लागले की, या देशांना कायम सदस्य केल्यास आपली ताकद कमी होईल. आपले जगावर वर्चस्व राहणार नाही अशी भीती अमेरिकेला वाटू लागली. अमेरिकेने जगातील कोणत्याही देशाला कायम सदस्य केले नाही. त्यामुळे भारत- अमेरिका संबंध बिघडत गेले.
4. अमेरिकेने भारताना इराकमध्ये शांतीसेना पाठविण्यास सांगितले परंतु भारताना याला नकार दिला. भारताने याबाबीला विरोध केला व इराकची भूमिका योग्य आहे. ही बाब जगाला भारताने सांगितली. त्यामुळे भारत अमेरिका संबंधात वाद निर्माण झाला.
5. अमेरिका पाकिस्तानला वारंवार शस्त्रास्त्र व आर्थिक मदत मोठया प्रमाणात करत आहे. त्याची उदाहरणे म्हणजे 1965 युद्ध, 1971 युद्ध, 1999 चे युद्ध या युद्धामध्ये अमेरिकेने पाकिस्तानला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत केलेली आहे. भारताच्या सत्य घटनाकडे अमेरिका जाणून बुजून दुर्लक्ष करत आहे. याची जाणीव भारताला झाला. त्यामुळे भारत-अमेरिका संबंध बिघडत गेले.
6. भारत-इराक गॅस पाईपलाईनला अमेरिकेने विरोध केला. यामुळे अमेरिकेचे कोणतेही नुकसान होणार नव्हते. परंतु भारताचा विकास थांबला पाहिजे ही कुटनीती अमेरिकेला करावयाची होती. त्यामुळे भारत- अमेरिका संबंधात दुरावा निर्माण झाला.
7. पाकिस्तान हे जगातील दहशतवादाचे नंदनवन आहे. प्रत्येक बाबतीत अमेरिका पाकिस्तनला पाठीशी घालत आहे. याबाबी भारताने जगासमोर मांडव्यात सुरुवात केली. त्यामुळे भारत- पाकिस्तान संबंध बिघडले. पर्यायी भारत-अमेरिका संबंधात दुरावा निर्माण झाला.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Issue XI , Vol. III (Indexed) Oct. 2020 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

**संदर्भसूची :-**

1. डॉ. मुनेष कुमार, स्वतंत्र भारत की विदेशनीती डिस्कव्हरी पब्लीशींग हाऊस, नई दिल्ली.2010
2. राममुर्ती मीना, भारत-अमेरिका संबंध, ए.बी.डी. पब्लीशर्स नई दिल्ली-2007
3. कै. डॉ.स. देसाई श्री मु.डॉ.सौ.भाल्लेराव निर्मला, भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन पुणे.2011
4. डॉ. गहालोत बी.सिंह, भारतीय विदेश नीती, अर्जून पब्लीशींग हाऊस, नई दिल्ली- 2013
5. डॉ. पंत पुष्पेष, डॉ.राखी पांचोला, आंतरराष्ट्रीय संबंध, मिनाक्षी प्रकाशन, मरेठ- 2013